| MHKO100005142017 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | :- | १४/०८/२०१७ |
| | नोंदणी दिनांक | :- | १४/०८/२०१७ |
| | निकाल दिनांक | :- | १० /०३ /२०२६ |
| | कालावधी | :- | वर्ष महिने दिवस |
| | | | ०८ ०६ २४ |

# प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (कोर्ट क्र.२) गडहिंग्लज, जिल्हा कोल्हापूर यांचे न्यायालयात,

**पिठासीन अधिकारी डी. एम. पवार**

**कौ.हिं.म.सं.अर्ज क्रमांक २१/२०१७**

**निशाणी क्रमांक – ११६**

१. सौ. सोनम संदीप धनुकटे, )
वय–२७ वर्षे, धंदा–घरकाम, )
रा. शिक्षक कॉलनी, नेसरी, )
तालुका गडहिंग्लज, जिल्हा कोल्हापूर ) ... अर्जदार

**विरुध्द**

१. श्री. संदीप राजाराम धनुकटे )
वय–३० वर्षे, धंदा–नोकरी, )
रा. गजरगांव, ता. आजरा, )
जिल्हा कोल्हापूर )

२. सौ. आंबुबाई राजाराम धनुकटे )
वय–५५ वर्षे, धंदा–घरकाम )
रा. सदर )

३. श्री. राजाराम विठोबा धनुकटे )
वय–६० वर्षे धंदा–बिल्डींग पेंटींग )
कॉन्ट्रॅक्टर रा.सदर )

४. सौ. वैशाली महादेव दबडे )
वय–३५ वर्षे धंदा–घरकाम )
रा. चव्हाणवाडी, ता. आजरा )
जि. कोल्हापूर ) ... वि.प.

**अर्ज – कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२ प्रमाणे**

**<u>विधिज्ञ</u> –**

श्री. एस. एन. फगरे – अर्जदारतर्फे विधीज्ञ.

श्री.आर.आय.पालकर – वि.प.तर्फे विधीज्ञ.

**न्यायनिर्णय**

( **दिनांक– १०/०३/२०२६ रोजी अधिघोषीत** )

प्रस्तुतचा अर्ज कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२, १८, १९, २०, २१, २२ व २३ अन्वये दाखल करणेत आलेला आहे.

**२.** अर्जातील मजकुर थोडक्यात असा की, अर्जदार यांचा विवाह वि.प.क्र.१ (यापुढे सोईकरीता वि.प. असे संबोधण्यात येते) यांचेबरोबर दिनांक १९/१०/२००९ रोजी हिंदू धर्मशास्त्र, जाती व रितीरिवाजाप्रमाणे मौजे गजरगांव, ता. आजरा, जि. कोल्हापूर येथे झाला आहे. सदर लग्नाचेवेळी अर्जदार हिचे आईवडीलांनी योग्य तो मानपान करून विवाहाच्या संपुर्ण जेवणावळीच्या खर्चासह विवाह करून दिला होता.

**३.** अर्जदार यांचे पुढे असे कथन आहे की, अर्जदार व वि.प. हे समृध्दी डी.एड कॉलेज, उचगांव, ता. व जि. बेळगांव येथे सन २००८-२००९ साली शिक्षणासाठी होते. लग्नानंतर अर्जदार व वि.प. यांनी डी.एड शिक्षणाकरीता सुळगा, ता.व जि.बेळगांव येथे भाडयाने राहून शिक्षण पुर्ण केले. विवाहापुर्वी वि.प. हे सैन्यात नोकरीस होते व त्यांचे पायाला इजा झालेने त्यांना सैन्यातून अनफिट केले होते.

**४.** अर्जदार व वि.प.चे शिक्षण पुर्ण झाल्यानंतर माहे जानेवारी २०१० पासून गजरगांव येथे अर्जदार व वि.प.क्र.१ ते ३ एकत्रात राहू लागले. त्यावेळी वि.प. व वि.प.क्र.२ अर्जदारला "तू घरात घुसलीस, हुंडा काही घेवून आली नाहीस, माहेरहून पाच लाख रूपये हुंडा व दहा तोळे सोने घेवून ये नाहीतर तुला नांदवणार नाही" असे म्हणून उपाशी ठेवणे, जास्त काम लावणे, वि.प.क्र.२ ही वि.प.ला अर्जदार विषयी खोटे

सांगून अर्जदारला मारायला लावणे असे प्रकार करू लागले. दिनांक ०५/१०/२०११ रोजी अर्जदार हिला जीव घेणी मारहाण करून अर्धमेले केले व अर्जदारचे सर्व कपडेलत्ते, विवाहाचे फोटो, सर्व साहित्य परडयामध्ये पेटवून टाकले व अर्जदार हिला अंगावरील कपड्यावर घरातून हाकलून लावले.

**५.** अर्जदार यांचे असे कथन आहे की, अर्जदार हीने वि.प.ला वारंवार फोन करून तसेच मध्यस्थ अनिल पाटील, सरपंच व पोलीस पाटील गजरगांव यांच्यामार्फत ५ ते ६ वेळा तडजोड करून वि.प.ना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, परंतु वि.प. यांनी कोणत्याही प्रकारे दाद दिली नाही. त्यानंतर अर्जदार ही स्वत:हून माहे जानेवारी २०१२ मध्ये गजरगांव येथे नांदायला गेली. परंतु वि.प.क्र.२ हीने अर्जदार हीस माहेरहून हुंडा का घेवून आली नाहीस म्हणून प्रचंड मानसिक त्रास दिला. सन २०१३ मध्ये वि.प.पोलीस खात्यामध्ये भरती झाला व जालना येथे प्रशिक्षणासाठी गेला. त्यावेळी वि.प.क्र.२ ने हुंडा घेवून येण्यासाठी अर्जदारास प्रचंड त्रास दिला व घरातून हाकलून लावण्याचे बरेच प्रयत्न केले.

**६.** अर्जदार यांचे पुढे असे कथन आहे की, जुन २०१५ मध्ये अर्जदार व वि.प. हे पोलीस क्वॉटर्स कोल्हापूर येथे एकत्र राहत असताना वि.प. दारू पिऊन येवून अर्जदारचा मानसिक व शारीरिक छळ करत होता. माहे ऑक्टोबर २०१५ मध्ये वि.प.क्र.१ व २ यांच्या छळामुळे अर्जदारचा तिस-या महिन्यामध्ये गर्भपात झाला. तसेच फेब्रुवारी २०१६ मध्ये वि.प.चे त्रासाने पुन्हा तिस-या महिन्यामध्ये गर्भपात झाला. त्यानंतर कु.शिवांजली ही मुलगी दिनांक ११/१२/२०१६ रोजी झाली असून बाळंतपणाचा संपुर्ण खर्च तिचे माहेरच्या लोकांनी केला आहे. बाळंतपणानंतर अर्जदार हीस प्रथम माहेरी पाठवून दिले नाही व बळजबरीने सासरी घेवून गेले.

**७.** अर्जदारचे पुढे असेही कथन आहे की, दिनांक १०/०५/२०१७ रोजी कोल्हापूर येथे अर्जदार वि.प.बरोबर नांदण्यास गेली असता तिला पोलीस खात्याची भिती घालून शिवीगाळ करून मारहाण केली. दिनांक १४/०६/२०१७ रोजी अर्जदारशी भांडण काढून मारहाण करून कु.शिवांजलीसह अंगावरील कपडयासह घरातून हाकलून

लावण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर वि.प. यांनी अर्जदार हिस शिवीगाळ, मारहाण करून दमदाटी देवून कोल्हापूर येथून बळजबरीने महिंद्रा बोलेरो गाडीतून गडहिंग्लज येथे घेवून जावून तथाकथित घटस्फोटाचे कागदावर मजकूराची कल्पना न देता अर्जदार व कु. शिवांजली यांना जीवे ठार मारण्याची धमकी देवून अर्जदार हिचे इच्छेविरूध्द सहया करण्यास भाग पाडले. तसेच अर्जदार हिस तथाकथित घटस्फोटाचे अर्जाप्रमाणे काहीही रक्कम अगर धनादेश वि.प. यांनी दिली नाही.

**८.** अर्जदार यांचे पुढे असे कथन आहे की, तिची वि.प.बरोबर नांदणेची व प्रामाणिकपणे संसार करणेची इच्छा असून देखील पाच लाख रूपये व दहा तोळे सोने आणण्याच्या कारणावरून वि.प. हे अर्जदारास नांदवून घेणेस तयार नाहीत, तसेच अर्जदार हिला नांदवून घेण्याबाबत त्यांनी काहीही प्रामाणिक प्रयत्न केले नाहीत. यावरून वि.प.स अर्जदार हिचेशी प्रामाणिकपणे संसार करण्याची इच्छा नसलेचे स्पष्ट होते. अर्जदारास हुंडयाच्या कारणावरून त्रास देवून वि.प.ने स्वतःहून दिनांक १४/०६/२०१७ इ. रोजी तिचा त्याग केला असलेने अर्जदारला नाईलाजास्तव तिचे माहेरी नेसरी, ता. गडहिंग्लज येथे शेजारच्या लोकांच्या मदतीवर रहावे लागत आहे.

**९.** अर्जदार यांचे पुढे असेही कथन आहे की, वि.प. यांनी अर्जदार व शिवांजली यांचे पोटापाण्याची, कपडेलत्याची, राहाण्याची अगर औषधपाण्याची कोणतीही सोय केलेली नाही. अर्जदार ही स्वतःचा चरितार्थ, पालनपोषण व उदरनिर्वाह चालविणेस असमर्थ आहे, तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. अर्जदार हिला शेजाऱ्यांच्या मदतीवर नाईलाजास्तव कशीबशी आपली गुजराण करावी लागत आहे. अर्जदार व शिवांजली हिचेवर उपासमारीची वेळ आली आहे. अर्जदार व शिवांजली ही वि.प. यांचेवरच पूर्णपणे अवलंबून आहे. त्यामुळे अर्जदार व शिवांजली यांना प्रत्येकी दरमहा रक्कम रू.१५,०००/- वि.प.कडून पोटगी रक्कम दाखल देणेचा हुकूम होणे अत्यंत आवश्यक आहे.

**१०.** अर्जदार यांचे पुढे असेही कथन आहे की, वि.प.यांची आर्थिक परिस्थिती अतिशय चांगली असून त्यांना सैन्य दलाची पेन्शन म्हणून दरमहा रक्कम रूपये

३०,०००/- मिळते. वि.प. हे पोलीस खात्यामध्ये कायमस्वरूपी नोकरीस असून त्यांना दरमहा रक्कम रूपये ४५,०००/- इतका पगार आहे. वि.प.क्र.३ यांचे नावे ५ एकर बागायत ऊस पिक जमिन असून त्यापासून त्यांना वार्षीक रक्कम रूपये ५,००,०००/- इतके उत्पन्न मिळते. वि.प.यांच्या तीन दुभत्या म्हैशी असून त्यापासून त्यांना आठवड्याला रक्कम रूपये ४,०००/- इतके उत्पन्न मिळते. वि.प.यांची स्वतःची मोटार सायकल व अल्टो कार आहे. वि.प.क्र.३ हे बिल्डींग पेंटींग कॉन्ट्रॅक्टर असून त्यांना दरमहा रक्कम रूपये ५०,०००/- इतके उत्पन्न मिळते. वि.प.यांचे राहणीमान व आर्थिक परिस्थिती चांगली आहे. वि.प.हे हेतूपुरस्सर अर्जदार व शिवांजली हिचे पालनपोषण करीत नाहीत. वि.प.यांचे सदरचे कृत्य कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ अन्वये करण्यात आले असून अर्जदार यांनी या प्रकरणात खालीलप्रमाणे मागण्या केल्या आहेत.

१) वि.प. यांनी अर्जदार यांना शारिरीक व मानसिक त्रास देवू नये, कोणत्याही प्रकारची धमकी व दमदाटी करु नये तसेच अर्जदार यांचे जिवीतास कोणताही धोका होईल असे कोणतेही कृत्य करु नये याकरीता संरक्षण आदेश.

२) अर्जदार यांना निवा-याची कोणतीही व्यवस्था नसल्यामुळे निवा-याची व्यवस्था किंवा घरभाडे रुपये १००००/- देणेबाबत वि.प. यांना आदेश व्हावा.

३) अर्जदार व शिवाजंली यांना वि.प.कडून प्रत्येकी दरमहा रुपये १५,०००/- पोटगी देणेबाबत आदेश व्हावा.

४) अर्जदार यांना वि.प.कडून त्यांचे मानसिक व आर्थिक नुकसान भरपाईपोटी रक्कम रूपये २,००,०००/- देणेबाबत आदेश व्हावा.

५) अर्जदार यांचे अंगावरील स्त्रीधन/सौभाग्यलंकार परत देणेचा आदेश व्हावा.

**११.** वि.प.क्र. १ ते ४ यांनी निशाणी क्र.११ वर त्यांचे म्हणणे दाखल केले असून अर्जातील बहुतांश मजकुर नाकारला आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, अर्जदार व वि.प.यांचा विवाह दिनांक १९/१०/२००९ रोजी झाला असून त्याचा खर्च वि.प. यांनी केला आहे. अर्जदार ही १५ दिवस गजरगाव येथे राहिल्यानंतर वि.प. सोबत नांदण्यासाठी सुळगा येथे गेली. अर्जदार हिचे माहेरची आर्थिक परिस्थिती अत्यंत चांगली

असल्याने वि.प. यांना तुच्छतेची वागणूक देणे, अपमानास्पद बोलणे, घरातील दैनंदिन कामे न करणे, घरातील वस्तू किरकोळ कारणावरून फेकाफेकी करणे, जेवण न करणे, नेहमी आत्महत्या करण्याची धमकी देणे असे प्रकार करू लागली. तसेच वि.प. यांच्यावर खोटे आरोप करून संशयी वृत्तीने वागवत होती. सुळगा येथे राहत असताना वि.प. यांच्या बरोबर भांडण काढून माहेरी पळून गेली व तिथे ५ ते ६ महिने राहिली. त्यानंतर गजरगांव येथील नामदेव शिंत्रे व गावातील पंच यांच्या मध्यस्थीने अर्जदारास नांदावयास आणले, परंतु तिच्यामध्ये काही बदल झाला नाही.

**१२.** त्यांचे पुढे असे कथन आहे की, अर्जदारने घरामध्ये गुड नाईटची क्वाईल फोडून खाण्याचा व आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. अर्जदार ही वि.प.ला वारंवार मी तुझ्याजवळ राहणार नाही, तुझ्यात मला इंटरेस्ट राहिलेला नाही, मला घटस्फोट दे, नाही दिल्यास नस कापून घेईन व तुला देशोधडीला लावीन अशी धमकावत होती. त्यानंतर अर्जदार सन २०११ मध्ये वि.प.सोबत भांडण काढून पळून गेली व ३ वर्षे माहेरी राहिली. त्यावेळी अर्जदार ही हॉस्टेलला राहून शिक्षण घेत होती. त्यानंतर अर्जदारची बहिण पूनम हिच्या मध्यस्थीने सन २०१५ साली अर्जदार नांदावयाला आली परंतु अर्जदार खोटे बोलण्यात पटाईत असल्याने व तिचा स्वभाव विक्षिप्त असल्याने तिच्या वागण्यात काही फरक पडला नाही.

**१३.** त्यांचे पुढे असे कथन आहे की, वि.प.चे ट्रेनिंग पूर्ण झालेनंतर अर्जदार हिला कोल्हापूरमध्ये आणले व पोलीस लाईनमध्ये रहात असताना स्वैरभैर वागून रात्री-अपरात्री पळून जाणे, पोलीस लाईनमध्ये तमाशा करणे असे प्रकार करू लागली. वि.प. हे बेअब्रु होवू नये म्हणून अर्जदार हिचे इच्छेप्रमाणे राहण्याचा प्रयत्न करीत होते. त्याच दरम्यान अर्जदारला दिवस गेले होते, त्याचा संपूर्ण दवाखान्याचा खर्चही वि.प.ने केलेला आहे. अर्जदारचे बाळंतपण देखील वि.प.ने डॉ.हत्ती यांच्या दवाखान्यात केले व पुढे दवाखान्यामधून गजरगांव येथे आणले. परंतु अर्जदार ही गजरगांव येथे १५ दिवस राहीलेनंतर भांडण काढून व काहीतरी कुरापत काढून मुलीला घेवून आपले माहेरी पळून गेली व सहा महिने माहेरीच राहीली. वि.प.ला आपल्या मुलीचे हौसेखातर बारसे ठेवायचे

होते, त्यामुळे पुन्हा पंचामार्फत बैठक घेवून अर्जदारला बोलावून आणले व दि. ७/५/२०१७ इ. रोजी बारशाचा कार्यक्रम करून घेतला.

**१४.** मुलीचे बारसे झालेनंतर अर्जदार ही दोन दिवस मौजे गजरगांव येथे राहीली व वेडयासारखे काहीतरी आरोप करून "मला एकटीला रहायचे आहे, माझी तुमचेजवळ राहण्याची इच्छा नाही, मी पुण्यात एकटीच राहणार आहे, तेव्हा मला घटस्फोट दे व मोकळे कर" असे म्हणू लागली. त्यावेळी वि.प. व वि.प.तर्फे पै-पाहुणे व पंचानी अर्जदारला खूप समजावले. अर्जदार हीने आपल्याला येथे रहावे लागेल म्हणून रात्रीचे वेळी मुलीला घरी ठेवून पळून जाण्याचा प्रयत्न केला. म्हणून नाईलाजाने शेवटी अर्जदारचे इच्छेखातर घटस्फोट मिळणेसाठी एकमेकांचे संमतीने अर्ज दाखल केला असून सदरचा अर्ज प्रलंबित आहे. अर्जदारने खरी वस्तुस्थिती लपवून ठेवून प्रस्तूतचा अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे प्रस्तूतचा अर्ज कायदयाने चालणेस पात्र नाही. अर्जदारचा वि.प. यांनी कधीही कौटुंबिक छळ केला नव्हता व नाही. वि.प.क्र.३ हे गेल्या १० वर्षापासून विभक्त राहतात व वि.प.क्र.४ ही विवाहीत असलेने ती आपले पतीसोबत राहते. त्यामुळे अर्जदारचा अर्ज कायदयाने नामंजूर होणेस पात्र आहे. अर्जदार हिने सदरचा अर्ज खोटया व खोडसाळ मजकुराचे आधारे दाखल करून वि.प.यांना विनाकारण आर्थिक खर्चात व मानसिक त्रासात घातले असलेने अर्जदार हिचेवर रू. २५,०००/- इतकी कॉम्पेनसेटरी कॉस्ट बसविणेत येवून ती वि.प.ला वसुल होवून मिळावी. सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा.

**१५.** न्यायालयासमोर आलेला पुरावा, युक्तीवाद व दाखल कागदपत्रांवरुन माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित झाले आहेत, त्यांचे निष्कर्ष मी खालीलप्रमाणे कारणमिमांसेसह देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार यांनी सिध्द केले आहे का की, वि.प.क्र.१ ते ४ यांनी त्यांचेवर कौटुंबिक हिंसाचार केला आहे ? | होय. |

| | | |
|---|---|---|
| २ | अर्जदार ह्या वि.प.क्र.१ ते ४ यांच्या विरुध्द संरक्षण आदेश मिळणेस पात्र आहेत काय ? | होय. |
| ३ | अर्जदार यांनी सिध्द केले आहे काय की, त्यांना व मुलगी शिवाजंली यांना वि.प. यांच्याकडून प्रत्येकी दरमहा पोटगी रक्कम रुपये १५,०००/- मिळणेस त्या पात्र आहेत ? | अंशतःहोय. |
| ४ | अर्जदार यांनी सिध्द केले आहे काय की, त्या घरभाडे मिळणेस पात्र आहेत? | नाही. |
| ५ | अर्जदार यांनी सिध्द केले आहे काय की, वि.प. यांनी केलेल्या शारीरिक व मानसिक त्रासामुळे अर्जदार यांना नुकसान भरपाई म्हणुन रक्कम रुपये २,००,०००/- मिळण्यास त्या पात्र आहेत? | नाही. |
| ६ | अर्जदार ह्या वि.प. यांच्याकडून स्त्रीधन/ सौभाग्यलंकार परत मिळण्यास पात्र आहेत का? | नाही. |
| ७ | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**१६.** अर्जदार सोनम संदीप धनुकटे यांनी त्यांचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.१६ वर दाखल केले आहे. तसेच कागदोपत्री पुरावा निशाणी क्र.०३ सोबत दाखल केला आहे. तसेच निशाणी ५१ वर हिंदू मॅरेज पिटीशन क्र.१५९/२०१७ ची प्रत दाखल केली आहे. अर्जदारने पुरावा बंद पुरसीस निशाणी क्र.५९ वर दिली आहे.

**१७.** वि.प.संदीप राजाराम धनुकटे यांनी त्याचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.६७ वर दाखल केले आहे. नामदेव यलाप्पा शिंत्रे यांची साक्ष निशाणी १०१ वर नोंदवली आहे. वि.प.ने पुरावा बंद पुरसीस निशाणी क्र.१०७ वर दिली आहे.

**मुद्दा क्रमांक १ व २ करीता-**

**१८.** अर्जदार तर्फे विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, वि.प.हे सैन्य दलातून निवृत्त झाल्यानंतर पोलिस दलात नोकरी करत आहे. त्यांचे राहणीमान अतिशय उच्च दर्जाचे आहे. अर्जदारास उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. अर्जदार व शिवांजली यांच्या

पालनपोषण व इतर दैनंदिन गरजांसाठी वि.प.यांनी पोटगी देणे गरजेचे आहे व तशी त्यांची ऐपत आहे. त्यामुळे अर्जदारने केलेल्या मागण्या मंजूर करण्यात याव्यात अशी विनंती त्यांनी केली आहे.

**१९.** वि.प. तर्फे विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, सदर अर्ज दाखल करण्यास कोणतेही कारण अर्जदारास घडले नाही. वि.प. यांनी अर्जदारास कधीही घरगुती हिंसाचार केला नाही. अर्जदार व वि.प. यांचा अंतरजातीय प्रेमविवाह आहे. त्यांचे लग्न वि.प.च्या घरी झाले होते. त्यामुळे वि.प. यांच्या घरातून त्यांच्या लग्नाला विरोध नव्हता. वि.प. यांनी अर्जदाराकडे सोने व हुंडा मागितला नाही व तसे अर्जदाराने सिद्ध केले नाही. वि.प.यांनी अर्जदाराचा कधीही घरगुती हिंसाचार केला नाही, त्यामुळे अर्जदारने केलेल्या सर्व विनंत्या नाकारण्यात याव्यात व अर्ज नामंजुर करण्यात यावा.

**२०.** अर्जदार ही कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ मधील कलम १२ प्रमाणे पिडीत व्यक्ती आहे, ही बाब सिध्द करण्याची जबाबदारी अर्जदारची आहे. या अनुषंगाने अर्जदार हिने तिच्या नि.१६ वरील शपथपत्रात निशाणी १ मधील सर्व कथने नमूद केली आहेत. त्याची पुनरावृती टाळण्याकरीता या ठिकाणी नमूद करण्यात आलेली नाही.

**२१.** अर्जदारच्या उलटतपासात असे आले आहे की, त्यांना वि.प. यांनी मारहाण केली तसेच रक्कम व सोने मागितले म्हणून त्या गावातील सरपंच, पोलीस पाटील व पंच यांच्याकडे गेल्या होत्या. कोल्हापूर येथे शक्ती निवासस्थानात राहत असताना रात्री अपरात्री त्या गोंधळ घालत होत्या हे त्यांनी नाकारले आहे. सन २०१६ मध्ये महाशिवरात्रीचे वेळी नदीच्या दिशेने जीव देण्यासाठी जात असताना काही लोकांनी परत आणले हे त्यांनी नाकारले आहे. त्यावेळी त्यांच्या आईने त्या विक्षीप्त आहे तिला माफ करा व सांभाळून घ्या वि.प. यांना सांगितले होते हे देखील अर्जदारने नाकारले आहे. त्यांना वि.प.ने जबरदस्तीने कोल्हापूरला नेले होते व त्याबाबत पोलीस ठाणेत तक्रार दिली तर मुलीला मारून टाकेन अशी धमकी वि.प. यांनी त्यांना दिली होती असे अर्जदारने कथन केले आहे. वि.प.यांनी अर्जदारास कधीही त्रास दिला नाही हे कथन

त्यांनी नाकारले आहे.

**२२.** वि.प. यांनी त्यांच्या उलटतपासात अर्जदारने केलेले सर्व आरोप नाकारले आहेत. त्यांनी कधीही अर्जदारकडून रक्कम रूपये पाच लाख व दहा तोळे सोने मागितले नाही. तसेच त्यांनी कधीही अर्जदारास मारहाण केली नाही. त्यांचा व अर्जदारचा आंतरजातीय प्रेमविवाह होता. त्यांनी अर्जदारास मारहाण करून मानसिक त्रास दिल्याचे नाकारले आहे. त्यांनी अर्जदारास मारहाण करून जबरदस्तीने तिच्या घटस्फोटाच्या कागदावर सहया घेतल्या हे देखील नाकारले आहे. त्यांनी अर्जदाराचे चारित्र्यावर खोटे आरोप करून अर्जदारास मानसिक त्रास दिल्याचे नाकारले आहे.

**२३.** अर्जदार व वि.प. यांच्या वरील पुराव्यावरून असे दिसून येते की, वि.प. यांनी अर्जदारवरती केलेले आरोप अर्जदारने उलटतपासादरम्यान नाकारले आहेत. तसेच वि.प. यांनी उलट तपासादरम्यान अर्जदारने केलेले सर्व आरोप नाकारले आहेत. असे असले तरी अर्जदारने हे सर्व आरोप शपथेवर केले आहेत. तसेच वि.प. यांनी अर्जदारास केलेल्या हिंसाचाराबाबतचे आरोप अर्जदारचे उलटतपासात खोडून निघाले नाहीत.

**२४.** तसेच अर्जदार यांच्याकडून वि.प.यांनी घटस्फोटासाठी स्वतंत्र दस्त करून घेतला व त्याबाबत अर्जदारास रक्कम रूपये ३,५०,०००/- चा धनादेश दिला असे कथन वि.प.यांनी केले आहेत, परंतु त्याबाबत कोणताही पुरावा वि.प. यांनी दाखल केला नाही. वि.प.तर्फे साक्षीदार क्र.२ नामदेव शिंत्रे यांनी त्यांच्या उलटतपासात अर्जदारास रक्कम रूपये ७,००,०००/- पोहचले नाहीत असे कथन केले आहे. यावरून असे दिसून येते की, वि.प.यांनी कोणत्याही पुराव्याशिवाय अर्जदारास रक्कम रूपये ३,५०,०००/- चा धनादेश दिला हे खोटे नमूद केले आहे. वि.प. यांनी अर्जदारवरती केलेल्या आरोपाबाबत कोणताही पुरावा दाखल केला नाही.

**२५.** अर्जदार हिने केलेल्या कथनांवरुन ती आर्थिक दृष्टया सक्षम असल्याचे दिसून येत नाही. अर्जदार हिच्या माहेरची परिस्थिती साधारण दर्जाची असल्याचे दिसून

येते. अशा परिस्थितीत कुठलीही स्त्री कुठल्याही सबळ कारणाशिवाय तिच्यावर शारीरिक व मानसिक छळ झाल्याचे कथन करुन पतीचा त्याग करुन न्यायालयाचा दरवाजा ठोठावेल ही बाब पटणेजोगी नाही.

**२६.** अर्जदार हिने तिच्या पुराव्यात वि.प.यांनी तिचेवर केलेल्या अत्याचाराबाबत सविस्तर कथन केले आहे. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायद्याचे कलम ३ मध्ये कौटुंबिक हिंसाचार या शब्दाची समावेशक अशी व्याख्या दिलेली आहे. त्यानुसार वि.प. यांचे कडून कोणत्याही प्रकारची शारीरिक व मानसिक इजा, अगर अशी दुखापत की जी शारीरिक किंवा मानसिक स्वास्थ्यास धोका उत्पन्न करणारी किंवा वि.प. यांचेकडून होणारा शारीरिक व मानसिक त्रास देणारी शिवीगाळ तसेच वि.प. यांनी अर्जदारकडे केलेली हुंड्याची व इतर पैशाची मागणी तसेच तिचे जीवीताला धोका उत्पन्न होईल असे कृत्य किंवा तिची आर्थिक हेळसांड अशा प्रकारचा शारीरिक, मानसिक किंवा आर्थिक छळ या सर्वाचा समावेश 'कौटुंबिक हिंसाचार' च्या व्याखेत होतो.

**२७.** अर्जदाराचे पुराव्यातील कथने विचारात घेता, अर्जदारला वि.प.याने दिलेली वागणूक ही कौटुंबिक हिंसाचाराच्या व्याखेत बसते. वि.प. याने जरी अर्जातील सर्व मजकूर नाकारलेला असला तरी त्यांने उलटतपासात मान्य केलेल्या कथनांवरून वि.प. यांनी केलेल्या कौटूंबिक हिंसाचारामुळे अर्जदार ही तिच्या माहेरी तिच्या मुलासोबत राहत असल्याचे दिसून येते. अर्जदार माहेरी राहत असल्यापासून तिचे बाळंतपण व त्यानंतर मुलाचे संगोपन याकरीता वि.प.यांनी अर्जदारास कोणतीही आर्थिक मदत केली नाही हे वि.प. यांनी मान्य केले आहे. संरक्षण अधिकारी यांनी अभिलेखावर दाखल केलेल्या कौटुंबिक घटना अहवाल निशाणी २२ ची पाहणी केली असता त्यामध्ये अर्जदार हिच्यावर शारीरिक, शाब्दिक, भावनिक, आर्थिक व हुंड्यासंबंधी अत्याचार झाल्याचे नमूद असल्याचे दिसून येते. वि.प.याने दाखल केलेल्या पुराव्यावरून अर्जदारबाबत केलेली कथने सिध्द झाली नाहीत. अभिलेखावर उपलब्ध असलेला

साक्षी पुरावा व कौटुंबिक घटना अहवालाची पाहणी केली असता अर्जदारावर वि.प. यांचेकडून कौटुंबिक हिंसाचार होत असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे वि.प.विरुध्द प्रतिबंधात्मक आदेश पारित करणे आवश्यक झाले आहे. सबब मी मुद्दा क्र. १ व २ चा निष्कर्ष होकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्रमांक ३ करीता-**

**२८.** अर्जदार यांनी आपल्या अर्जामध्ये वि.प. यांची आर्थिक परिस्थिती अतिशय चांगली असून त्याला सैन्य दलाची पेन्शन म्हणून दरमहा रक्कम रूपये ३०,०००/- मिळते. तसेच वि.प.हा पोलीस खात्यामध्ये नोकरीला असून त्याला दरमहा ₹.४५,०००/- पगार मिळतो. त्याचप्रमाणे वि.प. यांचेवर इतर कोणतीही जबाबदारी नाही अगर त्याच्यावर कुटूंबातील कोणीही अवलंबून नाही असे कथन केले आहे.

**२९.** वि.प. यांनी उलटतपासामध्ये डी.एड करण्यापुर्वी ते भारतीय सैन्य दलात नोकरीस होते व त्या नोकरीतून कमी झाल्यानंतर त्यांना पेन्शन रक्कम रूपये २४,०००/- मिळते. तसेच ते पोलीस दलात सन २०१३ मध्ये भरती झाले आहेत. ते पोलीस दलात कायमस्वरूपी नोकरीस आहेत. ते आता चालक पदावर कार्यरत आहेत. त्यांना आता रूपये ४६,०००/- पगार मिळतो. गरजगाव येथे त्यांचे घर आहे. तसेच त्यांची मोटारसायकल व कार आहे. ते आता कोल्हापूर येथे नोकरीस असून त्यांचे आईवडील गजरगांव येथे राहतात. त्यांचे आईवडील घरातील कामे करून राहतात. अर्जदार व बाळाला त्यांच्याशिवाय कोणाचा आधार नाही असे मान्य केले आहे. त्यामुळे वि.प. यांना सैन्य दलातील पेन्शन व पोलीस दलातील नोकरीतून निश्चीत चांगले उत्पन्न मिळते हे स्पष्ट होते.

**३०.** अर्जदारने वि.प.क्र.३ च्या गजरगाव, ता. आजरा येथे वि.प.क्र. ३ च्या नावे घर मिळकत व बागायत शेती असून त्यांना शेतीपासून वार्षिक ५,००,०००/- उत्पन्न मिळते असे कथन केले आहे. अर्जदारने आपले कथनाचे पुष्टयर्थ निशाणी १३ वरील वर्णन यादीसोबत गजरगाव, ता. आजरा येथील वि.प.क्र.३ च्या नावे असणारा जमिनीचा खाते उतारा व ७ /१२ उतारा दाखल केला आहे. त्यावरून वि.प. यांच्या

कुटूंबास शेतीपासून उत्पन्न मिळत असल्याचे स्पष्ट होते.

**३१.** अर्जदारने आपल्या अर्जामध्ये पुढे असेही कथन केले आहे की, वि.प.यांच्या तीन दुभत्या म्हैशी असून त्यापासून त्यांना आठवड्याला रक्कम रूपये ४,०००/- इतके उत्पन्न मिळते. वि.प.यांची स्वतःची मोटार सायकल व अल्टो कार आहे. वि.प.३ हे बिल्डींग पेटींग कॉन्ट्रॅक्टर असून त्याना दरमहा रक्कम रूपये ५०,०००/- इतके उत्पन्न मिळते. परंतु त्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही.

**३२.** अर्जदारने तिच्या उलटतपासात तिचे शिक्षण डी.एड. झाले आहे असे कथन केले आहे. अर्जदार मडलगे ज्वेलर्स येथे काम करते व त्यापासून तिला रक्कम रूपये १५,०००/- पगार मिळतो हे अर्जदारने नाकारले आहे. अर्जदार नोकरी करते याबाबत कोणताही पुरावा वि.प.ने अभिलेखावर दाखल केला नाही. याउलट अर्जदार व शिवाजंली यांना त्यांच्याशिवाय कोणाचाही आधार नाही असे वि.प. यांनी मान्य केले आहे.

**३३.** अर्जदारवर मुलगी शिवाजंलीची जबाबदारी आहे. वि.प.यांनी उलटतपासात त्यांनी अर्जदार व मुलीचे पालन पोषणाची व्यवस्था सन २०१७ पासून केली नाही हे कथन नाकारले आहे. तसेच या कामी जमा केलेल्या पोटगीच्या रक्कमेशिवाय अर्जदार व शिवांजलीसाठी त्यांनी पैसे खर्च केले नाहीत हे कथन देखील त्यांने नाकारले आहे. अर्जदार व शिवांजली यांच्या पालनपोषणासाठी अंतरिम पोटगी व्यतिरिक्त वि.प. यांनी काय खर्च केला हे दाखविण्यासाठी त्यांनी कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. यावरून वि.प. यांनी अर्जदार व त्यांची मुलगी शिवांजली यांच्याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते.

**३४.** अर्जदार ही वि.प.ची पत्नी व शिवांजली ही वि.प.ची मुलगी असून त्यांची देखभाल करण्याची, त्यांच्या पालनपोषणाची व अन्न, वस्त्र व निवा-याची व्यवस्था

करण्याची नैतीक व कायदेशीर जबाबदारी वि.प.यांची आहे. त्यामुळे वि.प.अर्जदारला पोटगीची रक्कम देण्यास पात्र आहे. वि.प.यांनी अर्जदार माहेरी राहत असल्यापासून त्यांच्या पालनपोषणाची, औषधोपचाराची व कपडयांसाठी तसेच मुलीच्या शिक्षणासाठी कोणतीही आर्थिक तरतुद केलेली नाही. म्हणजेच वि.प.यांनी अर्जदाराचे आर्थिक शोषण केले आहे. वि.प. हे अर्जदार व मुलीला सांभाळण्याची जबाबदारी नाकारु शकत नाहीत.

**३५.** अंतरिम पोटगीच्या अर्जावरील आदेशानुसार अर्जदार व शिवांजली यांना प्रत्येकी रक्कम रूपये २०००/- अंतरिम पोटगी आजअखेर देणेचा आदेश पारीत करणेत आला आहे. शिवांजलीचा जन्म दिनांक ११/१२/२०१६ रोजी झाला आहे. तिचे वय ९ वर्ष आहे. सध्या ती शिक्षण घेत आहे. त्यामुळे तिचा शिक्षणाचा खर्च, सध्याची महागाई व अर्जदार तसेच वि.प. यांच्या राहणीमानाचा विचार करता अर्जदार व मुलगी शिवांजली यांना प्रत्येकी दरमहा रक्कम रूपये ४०००/- पोटगी वि.प.यांनी या आदेशपासून देणे उचित होईल. म्हणून मी मुद्दा क्र.३ चे उत्तर अंशतः होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.४ करीता-**

**३६.** अर्जदार यांनी अर्जात वि.प यांच्याकडून नुकसान भरपाई पोटी रुपये दोन लाखाची मागणी केली आहे. अर्जदाराचे शपथेवरील जबाब व अर्जातील कथन याचा विचार करता त्याबाबत अर्जदाराने कोणताही स्पष्ट उल्लेख त्यांच्या अर्जात केलेला नाही. अथवा त्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर सादर केला नाही. अर्जदाराच्या नुकसान भरपाईच्या मागणीकरीता त्यांनी स्पष्ट अशा शब्दात त्याची मागणी व इतर पुरावा दिला नसल्याने अर्जदाराच्या मागणीप्रमाणे त्यांना नुकसान भरपाई देता येवु शकत नाही, म्हणून मी मुद्दा क्र.४ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.५ करीता-**

**३७.** वि.प. हे गजरगाव, ता. आजरा, जि.कोल्हापूर येथील घरामध्ये अर्जदारास नांदवण्यास तयार नाहीत व स्वत: त्या घरात अत्यंत चांगल्या प्रकारे राहत आहेत. वि.प. यांनी गजरगाव, ता. आजरा, जि. कोल्हापूर येथील घर अर्जदार हिस राहणेसाठी खुले करून दयावे अथवा दरमहा रुपये १०,०००/- घरभाडे मिळावे अशी

विनंती अर्जदारने केली आहे.

**३८.** अर्जदार यांनी अर्जामध्ये अर्जदार सध्या राहते ते ठिकाण व पत्ता म्हणून शिक्षक कॉलनी नेसरी, ता.गडहिंग्लज, जि. कोल्हापूर असे नमुद केले आहे. यावरुन असे दिसून येते की, अर्जदार ही सध्या तिच्या माहेरी राहत आहे. अर्जदार हिने उलटतपासात असे कथन केले आहे की, ती मनोहर सुतार यांचे घरी भाडयाने राहते. सदर घरात ती व त्यांची मुलगी राहते. त्यांची आई देखील सुतार यांचे घरी भाडयाने राहते. मनोहर सुतार हे त्यांचे सावत्र वडील आहेत. मनोहर सुतार यांनी त्यांचा व त्यांच्या आईचा सांभाळ करण्याची जबाबदारी स्वीकारलेली असून ते त्यांचा चांगल्या प्रकारे सांभाळ करतात.

**३९.** अर्जदारने उलट तपासात मान्य केलेल्या कथनावरून असे दिसून येते की, मनोहर सुतार हे तिचे सावत्र वडील आहेत. ते तिचा चांगला सांभाळ करतात. ती त्यांच्या घरी भाडयाने राहते असे दर्शविण्यासाठी अर्जदारने कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. अर्जदारची आई देखील मनोहर सुतार यांच्याकडे भाडयाने राहते असे दाखविण्यासाठी देखील अर्जदार हिने कोणताही पुरावा दाखल केला नाही. म्हणजेच अर्जदार ही तिची मुलगी व आईसोबत मनोहर सुतार यांच्या घरी राहते असे दिसून येते. त्याकरीता तिला भाडे दयावे लागत नाही.

**४०.** गजरगांव येथे वि.प.चे आई-वडील राहतात. वि.प.हा नोकरीसाठी कोल्हापूर येथे राहतो. अर्जदार व वि.प.क्र.१ ते ३ यांच्यामध्ये वाद असल्याने अर्जदार तिच्या सासरी गजरगांव येथे राहत नसून माहेरी राहत आहे. त्यामुळे गजरगांव येथील घर अर्जदारला राहण्यासाठी खुले केल्यास अर्जदार व वि.प. यांच्यामध्ये होणा-या वादाचा परिणाम शिवांजलीच्या मनावर तसेच तिच्या पालनपोषणावर होणार आहे. त्यामुळे गजरगांव येथील घर अर्जदारास राहण्यासाठी खुले करून दयावे ही अर्जदारची मागणी मान्य करता येणार नाही. तसेच ती नेसरी येथे राहत असताना तिला घर भाडयासाठी रक्कम दयावी लागते असा कोणताही पुरावा अर्जदारने अभिलेखावर दाखल केला नसल्याने तिला मासिक घरभाडे म्हणून रक्कम रूपये १०,०००/- देण्याचा आदेश पारीत करता येणार नाही. त्यामुळे अर्जदार यांची रहिवासाची मागणी नामंजूर होण्यास पात्र

आहे. त्यानुसार मी मुद्दा क्र.५ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.६ करीता-**

**४१.** वि.प. यांनी अर्जदार हिच्या अंगावरील सोन्याचे मंगळसुत्र, कर्णफुले, पैंजन, पावने तीन तोळे गंठण, झुबे, रिंगा, दोन तोळयाचे नेकलेस, सोन्याचे बांगडया, तसेच शिवांजली हिचे सोन्याची चेन, कानातील रिंगा, पैंजन, बिंदल्या, मनगटया असे दागदागिने संसार उपयोगी साहित्य, संसार तसेच अर्जदाराचे कपडेलत्ते इत्यादी स्त्रीधन/ सौभाग्यलंकार अर्जदार यांचे ताब्यात देणेबाबत आदेश व्हावा अशी विनंती केली आहे.

**४२.** अर्जदार यांना लग्नात तिच्या आई-वडीलांनी हे सर्व दागिने दिले होते याबाबत कोणताही पुरावा अर्जदारने अभिलेखावर दाखल केला नाही. तसेच संसार उपयोगी साहित्य, संसार सेट म्हणून अर्जदारास कोणत्या वस्तू दिल्या होत्या हे देखील अर्जदारने तिच्या अर्जात कथन केले नाही. तसेच त्याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. शिवांजलीचे सोन्याचे व चांदीचे दागिने होते व ते वि.प. यांच्या ताब्यात आहेत याबाबत देखील कोणताही पुरावा अर्जदारने अभिलेखावर दाखल केला नाही. त्यामुळे वि.प.क्र.१ ते ४ यांनी अर्जदारच्या अंगावरील दागिने काढून घेतले व ते त्यांच्या ताब्यात आहेत असे दाखविणारा कोणताही पुरावा अर्जदार अभिलेखावर दाखल केला नाही. म्हणून अर्जदार यांची सदर विनंती नामंजूर होण्यास पात्र आहे. त्यानुसार मी मुद्दा क्र.६ चे उत्तर नकारार्थी नोंदविले आहे

**मुद्दा क्र.७ करीता-**

**४३.** मुद्दा क्र. १ ते ३ च्या चर्चेवरुन असा निष्कर्ष निघतो की वि.प. यांनी अर्जदारास कौटुंबिक हिंसाचार केला. त्यामुळे अर्जदार या त्यांच्या माहेरी राहात आहेत. या दरम्यानच्या काळात वि.प. यांनी अर्जदार व त्यांच्या मुलीच्या अन्न, वस्त्र, औषधोपचार तसेच शिक्षण याकरिता कोणतीही आर्थिक तरतुद केली नाही. त्याकरिता अर्जदारास सदर अर्ज दाखल करणे भाग पडले. त्यामुळे या अर्जाचा खर्च रक्कम रु.४,०००/- वि.प. यांनी अर्जदारास दयावा. त्यानुसार मी मुद्दा क्र.७ च्या निष्कर्षाबाबत खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज अंशत: मंजूर करण्यात येतो.

२. वि.प.क्र.१ यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अर्जदार व त्यांची मुलगी शिवांजली यांना प्रत्येकी दरमहा रक्कम रु.४,०००/- ( अक्षरी रुपये चार हजार मात्र ) पोटगी या आदेशाच्या तारखेपासून द्यावी.

३. वि.प.क्र.१ यांनी आज अखेर अर्जदार व शिवांजली यांना प्रत्येकी दरमहा अंतरिम पोटगी रुपये २०००/- ( अक्षरी रुपये दोन हजार मात्र ) द्यावी.

४. वि.प. यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अर्जदार यांना शारिरीक व मानसिक त्रास देवू नये तसेच कोणत्याही प्रकारे धमकी देवू नये, दमदाटी करु नये तसेच अर्जदार यांचे जिवीतास कोणताही धोका होईल असे कोणतेही कृत्य करु नये.

५. वि.प.क्र.१ यांनी या अर्जाचा खर्च रक्कम रु.४,०००/- ( अक्षरी रुपये चार हजार मात्र ) अर्जदारला दयावा.

६. सदर निकालाची प्रत उभय पक्षांना विनामुल्य देण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2026.03.10 17:53:41 +0530

दिनांक- १०/०३/२०२६
गडहिंग्लज

डी. एम. पवार
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, (कोर्ट क्र.२)
गडहिंग्लज